RNI No. MAHMAR/2021/81470

दैनिक
# सुवर्ण महाराष्ट्र

■ मुख्य संपादक अंकुश हिम्मतराव कडू

वाशिम ■ शनिवार ,१६ मार्च २०२४ ■ वर्ष ३ रे ■ अंक २७४ ■ पृष्ठ ६ ■ किमत रु. ३.०० ■ उपसंपादक- साजीद आरीफ शेख

# लोकसभा निवडणुकीचा आज वाजणार बिगुल

नवी दिल्ली : सर्वांत मोठा लोकशाही उत्सव असलेल्या भारतातील लोकसभा निवडणुकीचा बिगुल शनिवारी वाजणार आहे. १६ मार्च रोजी दुपारी तीन वाजता भारतीय निवडणूक आयोग निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणार आहे. त्याबाबत निवडणूक आयोगाच्या प्रवक्त्याने 'एक्स'वर ही माहिती दिली. त्यानंतर देशात आदर्श आचारसंहिता लागू होईल.

लोकसभेच्या ५४३ जागांसाठी सात टप्प्यांत मतदान होऊ शकते. याआधीही २०१४ आणि २०१९ मध्ये सात टप्प्यांत मतदान झाले होते. तत्पूर्वी, निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती झाल्यानंतर ज्ञानेश कुमार व सुखबीर सिंग संधू यांनी शुक्रवारी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासोबत तयारीचा आढावा घेतला.

सलग तिसऱ्यांदा निवडणूक जिंकून हॅट्रिक करण्यासाठी भाजप

## हॅट्रिक करण्यास भाजप सज्ज; विरोधक देणार आव्हान

रिंगणात उतरली आहे, तर विरोधी पक्ष एकजूट होऊन इंडिया आघाडीच्या माध्यमातून भाजपचा विजयी रथ रोखण्याचा प्रयत्न करणार आहेत.

अब की बार, ३७० पार

२०१९ मध्ये भाजपने ३०३ जागा जिंकून इतिहास रचला होता. 'अब की बार, ३७० पार'चा नारा भाजपने यंदा दिला आहे. तर एनडीएसह ४०० जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यासाठी भाजपने नियोजन आणि तयारीला सुरुवातही केली आहे. अयोध्येत राम मंदिराची उभारणी, कलम ३७० रद्द करणे, तिहेरी तलाक कायदा रद्द करणे, सीएए लागू करणे, ८० कोटी लोकांना मोफत अन्नधान्य तसेच गरीब कल्याणकारी योजना या भाजपच्या जमेच्या बाजू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपला विश्वास आहे की, केंद्रात तिसऱ्यांदा पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन होईल.

विरोधकांची एकजूट

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विजयी रथ रोखण्यासाठी विरोधी पक्षांची आघाडी इंडिया एकजूट होऊन लढणार आहे. जास्तीत जास्त जागांवर विरोधकांचा एकच उमेदवार उभा करून विरोधी मतांचे विभाजन रोखण्याचा त्यांचा प्रयत्न असणार आहे. पश्चिम बंगाल, पंजाब अशी काही राज्ये सोडली तर इतर राज्यांत विरोधी पक्ष एकवटले आहेत. पंतप्रधान पदाचा उमेदवार



म्हणून एकाही नेत्याच्या नावावर एकमत न होणे ही विरोधकांची सर्वांत मोठी कमजोरी आहे. ममता बॅनर्जी, भगवंत मान, मायावती यांसारख्या नेत्यांनी आघाडी नाकारणे ही एक इंडिया आघाडीसाठी नकारात्मक बाजू आहे.

# आयशरची धडक, वडील थेट पुलावरुन नदीत पडले

## मुलगा गाडीसह फरपटत गेला, बाप-लेकाचा दुर्दैवी अंत

नांदेड: उपचारासाठी रुग्णालयात जातं असलेल्या पिता पुत्रावर नियतीने घात केला. टेम्पोच्या धडकेने पिता पुत्राचा जागीच मृत्यू झाला. शुक्रवारी सकाळी नांदेड शहरातील आसना ब्रिज जवळही दुर्दैवी घटना घडली. दाजीबा गाढे (वय ६५) आणि गोपीनाथ गाढे (वय ४०) असं पिता-पुत्राचं नाव आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होतं आहे.

मयत हे नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर तालुक्यातील भोगाव येथील रहिवासी आहेत. गोपीनाथ गाढे हे आपल्या वृद्ध वडिलांना रुग्णालयात नेण्यासाठी दुचाकीने नांदेड शहराकडे जात होते. सकाळी सहा वाजेच्या सुमारास आसना उड्डाण पुलामार्गे हे पिता-पुत्र शहराकडे येत होते. आसना ब्रिजजवळ येताच समोरून भरधाव वेगाने येत असलेल्या आयशर टेम्पोने दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की टेम्पोच्या धडकेनंतर दाजीबा गाढे हे उड्डाण पूलावरून थेट खाली कोरड्या नदी पात्रात कोसळले. तर गोपीनाथ गाढे हे दुचाकीसह फरकटत गेला. दोघांना गंभीर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर आसना ब्रिज वर नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. घटनेनंतर आर्धापूर पोलीस आणि विमानतळ पोलिसांनी धाव घेतली. दोघा पिता पुत्राना रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मयत पिता पुत्र हे शेतकरी होते. गोपीनाथ गाढे हा घरातील करता पुरुष होता. घरचा करता व्यक्ती गेल्याने अर्धापूर तालुक्यात हळहळ व्यक्त होतं आहे.

# शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्या पिक विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांना मनसेने दिला झटका

## मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांच्या नेतृत्वात तालुका कृषी अधिकारी आफीस येथे दणका

**विशाल मासूरकर/यवतमाळ –** राळेगाव तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होवुन शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना पिक विमा मिळणे अपेक्षित होते परंतु पिक विमा कंपनीच्या मनमानी मुळे राळेगाव तालुक्यातील हजारो शेतकरी विमा मिळण्या पासुन वंचित राहिले आहेत त्यांना तत्काळ पिक विमा मिळावा यासाठी मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांच्या नेतृत्वात तालुका कृषी अधिकारी



आफीस येथे मनसे कार्यकर्त्यांनी धडक देत मागणी केली होती त्यासंदर्भात तालुका कृषि अधिकारी यांनी आज पिक विमा कंपनीचे प्रतिनिधी व मनसे पदाधिकारी, शेतकऱ्यांची बैठक आयोजित केली होती. यावेळी मनसे पदाधिकाऱ्यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना पिक विमा मिळणार कधी, गावात पिक विमा कंपनीचे प्रतीनीधी येऊन शेकर्याकडुन १०००/२००० रु घेऊन त्यांचाच पिक विमा जमा करतात असा सवाल मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांनी विमा कंपनीच्या प्रतिनिधींना विचारणा केली असता त्यांच्या कडून उडवा उडवी चे उत्तर देण्यात येत असल्याने संतप्त मनसे पदाधिकारी व शेतकऱ्यांनी या विमा कंपनीच्या प्रतिनिधींना मनसे स्टाईल ने चोप दिला आहे.

यावेळी सुरज लेणगुरे (मनसे तालुका अध्यक्ष राळेगाव) स्वप्निलभाऊ नेहारे (वाहतुक सेना राळेगाव तालुका अध्यक्ष) सचिन आत्राम (तालुका उप अध्यक्ष ) अरिफ भाऊ शेख ( वाहतूक सेना जिल्हा उपाध्यक्ष यवतमाळ) ऋषिकेश मिर्झापुरे गोपाळ मांदाडे रोशन गुरुनुले ता सरचिटणीस गजानन बुटे निलेश बुटे गणेश मांदाडे सह महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# मेट येथे अवैध वृक्षतोड, वनविभागाने माल केला जप्त

**सुवर्ण महाराष्ट्र / माहूर –** माहुर वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाच्या अंतर्गत वझरा नियतक्षेत्रातील मेट येथे एका शेतात मोह, लिंब व अंजन या प्रजातीच्या ३६ झाडाची अवैध कत्तल करण्यात आली.




ही माहिती कळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी दि.१२ मार्च रोजी पंचनामा करून सदरचा माल जप्त केला. माहुर तालुक्यातील मेट शिवारातील नाल्या काठच्या एका शेतात मोह, लिंब व अंजन या प्रजांतीच्या३६ (३५२-४४ घ.मी.) झाडांची अवैध कत्तल केली होती. या प्रकरणी उपवनंरक्षक केशव बाभळे, सहाय्यक वनसंरक्षक जी.डी. गिरी व वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांचे मार्गदर्शनात वनपाल मिर साजिद अली व वनरक्षक डी. के. माने प्रत्यक्षस्थळ गाठून पंचनामा करून सदरचा माल जप्त केला. अवैध वृक्षतोड प्रकरणी संबंधित शेतकऱ्यावर १,००० रुपये एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली. अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांनी दिली.

# गामीण पोलिस स्टेशन आरोपीला अटक करण्यात अपयशी

## तोडगाव चे ३५४ डि,१२(पोसको) प्रकरणाचे आरोपी मोकाट

**तोंडगाव –** सविस्तर वृत्त असे की , श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय मध्ये शिकत असलेली अज्ञात मुलगी दि ७/३/२४ इयत्ता दहावीचा पेपर सोडवून घरी जात असताना तोंडगाव येथील १)अविनाश नामदेव काळे रा . तोंडगाव २) साईराम नंदू गोटे ३) गणेश दत्तात्रय गोटे राहणार तोंडगाव या तीनही गुंड प्रतीच्या मुलांनी अज्ञात मुलीला धमक्या दिल्या होत्या. त्या धमक्याला बळी न पडता ,या त्या अज्ञान मुलीने व रणरागिनीने झालेल्या प्रकाराबाबत सगळं कथन त्यांच्या वडिलांसमोर मांडले आहे. त्या निमित्ताने वडिलांनी ग्रामीण पोलीस स्टेशन गाठून गुन्हे दाखल केले आहेत .या झालेल्या पोस्को प्रकरणांमध्ये ग्रामीण पोलिसांनी अद्यापही कोणत्याही प्रकारची रेड व अशा आरोपींना अटक केली नाही .नेमके या प्रकरणाला बरेच दिवस झाले आहे तरी सुद्धा ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी आतापर्यंत कोणताही आरोपी अटक केलेला नाही. तोंडगाव येथील झालेले बरेच गुन्हे पोलीस प्रशासनाने हे गुन्हे दाबण्याचे प्रयत्न केले आहे ,व गुंडांना साथ दिली. असा पोलीस स् प्रशासनाने अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकाला चालना दिली तर येणाऱ्या दिवसांमध्ये तोंडगावचे बिहार झाल्याशिवाय राहणार नाही.





या अगोदर या तीनही मुलांनी श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये जाऊन बारा ते पंधरा मुलीला धमक्या दिल्या आहेत. परंतु काही मुलींनी हे अशा घडलेल्या प्रकरणाबाबत वडिलाला सांगितलेले नाहीत .पण या रणरागिनी सर्व वडीलाजवळ सांगितले या तीनही आरोपींनी या अगोदर असे बरेचसे काही प्रकरण घडविले आहेत. अशा प्रकरणाला आळा बसवण्यासाठी या गुंडांना पोलीस प्रशासन अटक का करत नाही .यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांना पोलीस प्रशासन सुस्त का? अशा व्यक्तींना जर अटक झालेली नाही तर असे गुन्हे तोंडगाव मध्ये नेहमी घडत चालतील .ग्रामीण पोलीस स्टेशन पर्यंत तोंडगाव चे बरेच गुन्हे दाखल केलेले आहेत अद्याप पर्यंत पोलिसाला आरोपी शोधण्यात अपयशच आलेले आहे कोणताही गुन्हा आरोपींनी केल्यास त्या आरोपी ला अटक झालेली नाही व सजा झालेली नाही गुंडाचे समर्थन केले जाते. या तीनही आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यात यावी अशी बऱ्याच व्यक्तीची चर्चा आहे ज्या तपास अधिकाऱ्याकडे हा तपास दिलेला आहे .तो अधिकारी उडवा उडवी ची उत्तरे देऊन आरोपीची पाठराखण करत आहे .किंवा या आरोपीच्या नातेवाईका जाऊन पैसे घेण्याची चर्चा आहे यामुळेच हे तोंडगाव फॉक्सओ प्रकरण थंड गतीने चालत आहे .

आमचे श्रदास्थान



दिवंगत मा.आमदार श्री.राजेंद्रजी पाटणी साहेब यांच्या प्रयत्नातून मंजूर असलेल्या विविध विकास कामाचे भूमिपुजन

## भूमिपूजन...समारंभ

शुभहस्ते : मा.आ.ॲड निलय नाईक

प्रमुख अतिथी : ॲड. ज्ञायक राजेंद्र पाटणी

कार्यक्रमाचे अध्यक्ष: ठाकुरसिंग चव्हाण,भाजपा ता.अध्यक्ष

प्रमुख उपस्थिती : उमेश पाटील, जि.प. गटनेता, सुरेखा अशोक चव्हाण जि.प. सदस्या स्वातीताई अजय पाटील, जि.प.सदस्या, विजय पाटील भाजपा जिल्हाउपाध्यक्ष, अशोक चव्हाण भाजपा नेते,

- डॉ. अविनाश लोथे
- प्रकाश जाधव जिल्हाध्यक्ष पंचायत राज, ग्रामविकास

अरविंद पाटील इंगाले जि.प.सदस्य, प्रकाश राठोड अध्यक्ष तांडा सुधार समिती, प्रा. सुनिल काळे, जिल्हा सरचिटणीस भाजपा, रेखा शाम राठोड पं.स. सदस्या, गोविंदराव म्हातारमारे पं.स. सदस्य, सागरताई प्रकाश जाधव माजी सभापती पं.स. अनिता धनराज ढाले पं.स. सदस्या.

| अ.क्र. | गावाचे नाव कामाचे नाव | वेळ | अंदाजित किंमत |
|---|---|---|---|
| १. | फुलउमरी बौद्ध विहार बांधकाम करणे<br>बसस्थानक कमानापासून गराशा मंदीरपर्यंत सी.सी.<br>जि.प.दलित वस्ती सिमेंट रोड<br>शासकीय जागेत गजानन महाराज मंदीरासमोर सभामंडप बांधकाम | सकाळी ९ वाजता | १० लक्ष<br>१० लक्ष<br>९ लक्ष<br>७ लक्ष |
| २. | सोमेश्वर नगर अर्थसंकल्पासून पूर्ण झालेल्या सिमेंट रोडचे लोकार्पण<br>स्थानिक विकास निधीतील सिमेंट रोडचे लोकार्पण<br>महादेव मंदीर सभामंडपाचे लोकार्पण<br>स्मशानभूमीचे लोकार्पण,दोन बोअरवेलचे लोकार्पण<br>पेव्हर ब्लॉक लोकार्पण | सकाळी १० वाजता | ६५ लक्ष<br>१० लक्ष<br>१० लक्ष<br>१० लक्ष<br>३ लक्ष |
| ३. | पोहरादेवी पोहरादेवी ते धावंडा रस्ता मु.ग्रा.स.यो.<br>पोहरादेवी ते सावळी रस्ता मु.ग्रा.स.यो. | सकाळी ११वा. | २ कोटी २४ लक्ष<br>१ कोटी ७४ लक्ष |
| ४. | माहुली दलित वस्तीमध्ये सभामंडप | दुपारी १२ वा. | १० लक्ष |
| ५. | सिंगडोह रोहणा, सिंगडोह ते जोगलदरी रस्ता मु.ग्रा.स.योजना | दुपारी १ वा. | ४ कोटी ८९ लक्ष ८३ हजार |

विनित- सरपंच,उपसरपंच, ग्रा.पं.सदस्यव गावकरी मंडळी, फुलउमरी, सोमेश्वर नगर, पोहरादेवी, माहुली,सिंगडोह

वरील कामास विकास प्रेमी बांधवांनी उपस्थित राहावे ही विनंती.

## संपादकीय

# एक काय नि तीन काय?

निवडणुकांच्या तोंडावर राजीनामा देऊन निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी अनेकांची तशी पंचाईत केली. त्यांचा राजीनाम्याचा निर्णय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनाच माहीत नव्हता आणि आज राजीनाम्यास तीन दिवस होत आले तरी त्यामागील कारण कोणास ठाऊक नाही. प्रथेप्रमाणे खरे तर आपला राजीनामा त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांकडे देणे अपेक्षित होते. कारण गोयल हे कुमार यांस उत्तरदायी होते. पण तरी त्यांनी राजीनामा पाठवून दिला तो थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे. राष्ट्रपतींनी दुसऱ्या दिवशी तो स्वीकारला आणि तसे जाहीर झाल्यावर गोयल यांच्या राजीनाम्याची बातमी झाली. त्याआधी पश्चिम बंगाल आदी राज्यांच्या निवडणूक तयारी पाहणी दौऱ्यात गोयल हे मुख्य निवडणूक आयुक्तांसमवेत होते. त्या वेळीही त्यांना गोयल यांच्या हालचालींचा सुगावा लागला नाही. या आठवड्याची सुरुवात या दोघांच्या जम्मू–काश्मीर दौऱ्याने होणार होती. त्याआधीच गोयल यांनी राजीनामा दिला. सरकारनेही त्यांच्या राजीनाम्याच्या कारणांसंदर्भात काहीही अधिकृत/अनधिकृत शब्द काढलेला नाही. लोकसभा निवडणुकांचा हंगाम ऐन भरात येऊ पाहत असताना निवडणूक आयुक्तांचे असे अचानक राजीनामा देणे केवळ बुचकळ्यात पाडणारे नाही. तर त्यातून व्यवस्थेच्या पारदर्शकतेबाबत महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे हा राजीनामा अनेकांची पंचाईत करणारा ठरतो. याचे कारण असे की हे गोयल महाशय आयोगातील त्यांच्या नेमणुकीपासूनच वादग्रस्त होते. त्यांची नेमणूक अनेकार्थी गाजली. त्यांना स्वेच्छा निवृत्त करून, राजीनामा त्वरेने मंजूर करून या पदावर नेमले गेले. हा सरकारी झपाटा इतका होता की सर्वोच्च न्यायालयानेही तो पाहून आश्चर्य व्यक्त केले होते. त्यांस नेमताना गोयल हे आगामी मुख्य निवडणूक आयुक्त असतील, अशी तजवीज केली गेली होती. म्हणजे ते या पदावरून उतरले नसते तर राजीव कुमार यांच्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त बनले असते आणि आणखी तीन वर्षे त्यांस या पदावर राहता आले असते. त्यांच्या राजीनाम्याने हे सर्वच मुद्दे निकालात निघाले. त्यांची नेमणूक ज्या पद्धतीने झाली त्यामुळे ते सरकारधार्जिण्या निवडणूक आयोग यंत्रणेचा आणखी सरकारधार्जिणा चेहरा बनले. परंतु त्यांनी राजीनामा दिला आणि सगळे चित्रच बदलल्यासारखे झाले. म्हणजे ज्या माध्यमांनी त्यांच्यावर टीका केली होती ती माध्यमे गोयल हे कोणी नीतिमान पुरुषाचा अवतार असल्यासारखे भाष्य करू लागली. ही अलीकडची एक नवीनच प्रथा. म्हणजे काँग्रेसादी निधर्मी पक्षांतून भाजपत गेलेला कोणताही नेता भाजपत प्रवेश केल्या केल्या लगेच हिंदुत्ववादी, संस्कृतिरक्षक आदी ज्याप्रमाणे होतो त्याप्रमाणे कारणाविषयी अनभिज्ञ असले तरी कोणी पदत्याग केला रे केला की लगेच तो प्रामाणिक, सडेतोड वगैरे गणला जाऊ लागतो. गोयल यांच्याबाबत हेच होताना दिसते. केंद्र सरकारातील कथित दडपशाही, दांडगाई येथपासून पश्चिम बंगालात निवडणुका हाताळण्यातील मतभेद यापर्यंत अनेक कारणे गोयल यांच्या राजीनाम्यासाठी दिली गेली. म्हणजे माध्यमांनी आपल्याआपल्यातच दिली. जो अधिकारी कालपर्यंत सरकारधार्जिणा गणला जात होता तो अचानक प्रशासकीय अधिकार, नैतिकता आदींचा उद्गाता बनला आणि या राजीनाम्याचे निमित्त साधत व्यवस्थेवर टीका सुरू झाली. येथपर्यंत ठीक. व्यवस्थेवर टीका ही अनेकार्थी क्षम्य ठरेल. पण त्यासाठी गोयल यांच्या राजीनाम्याचे कारण असण्याची गरज नाही. उलट या राजीनाम्याच्या निमित्ताने निवडणूक आयोग नामे यंत्रणेतील पारदर्शकतेचा अभाव हा विषय चर्चेस येणे गरजेचे होते आणि आहेही.

# निवडणूक हरल्यास राजाचा रंक होतो

आपल्या देशात ज्याला मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला आहे, तो कोणीही नागरिक स्त्री अगर पुरुष आपल्या गावातील ग्रामपंचायत,पंचायत समिती, जिल्हापरिषद, विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा इत्यादी ठिकाणी आपला उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणुक लढवू शकतो. निवडणुकीस उभे राहण्यासाठी उच्च शिक्षणाची कोणतीहि अट नसते. फक्त त्या उमेदवाराची निवडून येण्याची खात्री असली पाहिजे. यात महत्वाचे म्हणजे तो उमेदवार आर्थिक दृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे. या ठिकाणी एक जुनी म्हण आठवते.

असतील शिते तर जमतील भुते आजच्या काळात तेच उमेदवार निवडून येतात. निडणूक लढवणे हे गरिबांचे काम नाही. पण एकदा डोक्यात निवडणुकीची नशा चढली कि आपण कसेहि निवडणूक आपणच जिंकणार हा तो विचार करीत असतो. पूर्वी एका गावात ग्रामपंचायततीची निवडणूक लागली एकाने ठरविले. आपण निवडणूक लढवून गावाचा सरपंच होण्याची संधी आपणाला नक्कीच मिळणार याच विचार रात्रंदिवस विचार करीत होता आणि शेवटी निवडणुकीची वेळ आली. मतदान होऊन मतमोजणी झाली आणि हा उमेदवार काही मताने निवडणुकीत त्याचा पराभव झाला. त्या उमेदवाराच्या मनावर एवढा परिणाम झाला की मी पडलो.. मी पडलो.. मीं पडलो..असाच बडबड करू लागला. त्याचे डोक्यावर परिणाम झालेमुळे त्याला जवळच्या वेड्याच्या हास्पिटल मध्ये भरती करावे लागले होते. असेही राजकारणी लोकांची लहानपणी ऐकलेली आजही माझे लक्षात होती. अशीच काही दिवसा पूर्वी सामाज माध्यमावर विडिओ ऐकावयांस मिळालेला होता तो असा की रातोरात श्रीमंत होण्याचा फंडा म्हणून राजकारणातलं करिअर अनेकजण निवडतात .गॉगल वगैरे घातलेले चार दोन कार्यकर्ते आलिशान कार आणि लोकांचा गराडा अशी भुरळ अनेकांना पडते. मात्र राजकारणात अपयश आलं की राजाचा रंक कसा होतो, तसं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे वाशिमचे महादेव ताटके. राजकारणा पायी कोट्यवधीच्या संपत्तीचा कचरा झाला आणि ते रस्त्यावर आले. राजकारणात या संपूर्ण आपलं अस्तित्व गमावून बसलेल्या माणसाची ही गोष्ट .ज्यांनी कार्यकर्त्यांना यांनी मोफत मोटरसायकली वाटल्या ,ज्यांनी चार चाकी भेट म्हणून दिल्या, ज्यांनी शेतकरी यांना मोफत बियाणे वाटले. त्या महादेव ताटके यांचेवर आज उपासमारीची वेळ आली आहे. कोणी पन्नास शंभर रुपये दिले तर एक वेळचे पोट भरत. एवढी वाईट परस्थिती त्यांचेवर ओढवलेली आहे.महादेव ताटके रोजगाराच्या शोधात मुंबईला गेले. लाखो नाही तर करोडो रुपयाची कमाई करून त्यांनी आपलं नाव मोठं केलं. गरिबीची जाण असणारे महादेव ताटके यांना समाजसेवा करण्याचा विचार आला आणि मुंबई सोडून परत गावी आले. समाजकारण करताना राजकारणाचा विचार मनात आला आणि तिथेच त्यांचा उलट प्रवास सुरू झाला. ताटकेंनी २००९ सालची विधानसभा निवडणूक लढविण्याचा त्यांनी निर्णय घेतला. कार्यकर्त्यांना त्यांनी ७५ मोटर सायकल भेट दिल्या. ३ टाटा कंपनीची चारचाकी मोटर भेट दिल्या, खते ,बी बियाणे, साड्या ,चोळी वाटप केलं . वर्तमानपत्रातून त्यांच्या पानभर जाहिराती येवू लागल्या. मात्र २००९ विधानसभेच्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. राजकारणात आर्थिक ताळमेळ नीट न सांभाळता आलेने हातचा पैसा गमवावा लागला. मी आयुष्यात स्वतः विषयी कधीच विचार केला नाही. मी गरीबांचा विचार केला. कारण गरिबी मी अगदी जवळून बघितली. कमीत कमी त्या टाईमाला विधानसभेला माझे दोन करोड रुपये गेले, हे सामाजिक कामाचे दोन चार करोड गेले. दहा करोड त्यावेळी कॅश होती. आज दहा रुपये सुध्दा नाहीत. मंडळी ताटकेवर आता मात्र फाटके कपडे घालून फिरण्याची वेळ आली आहे.

सुवर्ण महाराष्ट्र
जी.एस. कुचेकर पाटील
भुईंज ता. वाई जि. सातारा
७५८८५६०७६१



त्याला कारण ठरली आहे ती राजकारणाची वाट.

ही वाट धरली नसती तर कदाचित आज ताटक्यांचे दिवस काही वेगळे असते.तुम्ही जर सामाजिक काम ,राजकारण करत असताना तुम्ही व्यवसाय मध्ये उतरा व्यवसाय करा तुम्ही व्यवसाय मध्ये काही चांगले होईल. राजकारणामध्ये काही कळलं नाही. कारण तुमच्या समोर जागताच व्यक्ती मूर्ती आहे महादेव ताटके. त्यांनी तो काय होता काय झाला. आजच्या तारखे त्यांच्या सोबत कोणीच नाहीये. सगळ्यांना नवीन कार आणि लोकांचा गराडा अशी भुरळ अनेकांना पडते. मात्र राजा करण्यात अपयश आलं की राजाचा रंग कसा होतो. तसं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे वाशिमचे महादेव ताटके. राजकारणापायी कोट्यवधीच्या संपत्तीचा कचरा झाला आणि ते रस्त्यावर आले. पाहुयात राजकारणाच्या नादात या संपूर्ण आपलं अस्तित्व गमावून बसलेल्या माणसाची ही गोष्आजचा म्हणून शेतकऱ्यांना मोफत द्यायला वाटलं शंभर रुपये दिले लाखो नाही तर रुपयाची कमाई करून त्यांनी आपलं नाव मोठं केलं. गरिबीची जाण असणारे समाजसेवा करण्याचा विचार आला आणि मुंबई सोडून परत गावी आले समाजकारण करताना राजकारणाचा विचार आला आणि झाला त्यांनी निर्णय घेतला कार्यकर्त्यांना ७५ मोटार सायकल त्यावेळी त्यांनी भेट दिल्या.

टाटा कंपनीची तीन चार चाकी वाहन ही भेट दिली. वर्तमानपत्रातून त्यांच्या पान भरून जाहिराती येऊ लागल्या मात्र २००९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. राजकारणात यशस्वी होण्याच्या नादात आर्थिक ताळमेळ न साधता आल्याने हातचा पैसा गमवावा लागला. दानशूर व्यक्तिमत्व म्हणून त्यांनी मोठा खर्च केला. हातचे सगळे पैसे संपले. कार्यकर्ते दुरावले ज्यावेळेस त्यांना मदतीची गरज होती त्यावेळेस त्यांच्याकडे अनेकांनी तोंडे फिरवली. त्यानंतर आज त्यांची परिस्थिती एवढी बिकट आहे की, त्यांना त्यांचे घर चालवणेहि कठीण झालेले आहे. आता मदतीची आस लावून बसले ना माणूसपणाचे दर्शन घडणार का ? त्यांच्या मदतीसाठी कोणी पुढे येणार का असाच प्रश्न ताटके यांच्या नजरेतून दिसतो. आपल्या मतदारसंघातील लोकांसाठी आपल्या कार्यकर्त्यांसाठी ज्यांनी लाखो करोडोंचा खर्च केला. त्यांच्यावर आज अनवाणी चालण्याची वेळ आली आहे.एकेकाळी नेते मंडळींच्या घराण्यात असणारे महादेव ताटके आता मात्र एकाकी पडले आहेत. कायम इस्त्रीचे कपडे घालून फिरणारे आता मात्र फाटके कपडे घालून फिरण्याची वेळ आली आहे. याला कारण ठरली आहे ती राजकारणाची वाट. ही वाट चांगली नाही सामाजिक राजकारण करत असताना तुम्ही व्यवसाय मध्ये उतरा व्यवसाय करा तुम्ही व्यवसाय मध्ये काही चांगले होईल. कारण राजकारणामध्ये काही कळलं नाही. कारण तुमच्या समोर जागत व्यक्तिमत्व महादेव ताटके. त्यांनी तो काय होतं काय झाला. आजच्या तारखेला सोबत किती लोक होती ना त्याच्या कडे कोणीच नाहीये .म्हणून माझी सगळ्याना विनंती आहे की बाबा तुम्ही शिक्षणावर जास्त जोर द्या. तुमच्या परिवारात व्यवसायामध्ये बोला. हेच माझे सगळ्याना नवीन मला मात्र राजा करण्यात अपयश आलं की राजाचा रंग कसा होतो. तसं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वाशिमचे महादेव ताटके. राजकारणात कोट्यवधीच्या संपत्तीचा कचरा झाला आणि ते रस्त्यावर आले. पाहुयात राजकारणाच्या नादात या संपूर्ण आपलं अस्तित्व गमावून बसलेल्या माणसाची ही गोष्ट. कार्यकर्त्यांना मोफत मोटर सायकल वाटल्या शेतकऱ्यांना मोफत बियाणं वाटलं वाशिमच्या मंगरूपीचे महादेव नाटके रोजगाराच्या शोधात मुंबईला गेले लाखो नाही तर करून रुपयांची कमाई करून त्यांनी आपलं नाव मोठं केलं गरिबीची जाण असणारे माझा समाजसेवा करण्याचा विचार आला आणि मुंबई सोडून परत गावी आले. समाजकारण करताना राजकारणाचा विचार आला आणि सुरू झाला कार्यकर्त्यांना ७५ मोटरसायकल त्यावेळी त्यांनी भेट दिल्या टाटा कंपनीची तीन चार चाकी वाहन ही भेट दिली वाटप केलं वर्तमानपत्रातून त्यांच्या पान भरून जाहिराती येऊ लागल्या मात्र २००९ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. राजकारणात यशस्वी होण्याच्या नादात आर्थिक ताळमेळ न सांगता आल्याने ताटक्यांना हातचा पैसा गमवावा लागला. मी लोकांचा विचार केला गरीबांचा विचार केला. विधानसभेला हे सामाजिक काम करत आहे ज्यावेळेस त्यांना मदतीची गरज होती त्यावेळेस त्यांच्याकडे अनेकांनी पाठ फिरवली.जबरदस्त कमी झाला च चालले गेले त्यानंतर आज त्यांची परिस्थिती एवढी बिकट आहे की त्यांच्या त्यांना त्यांचे घर चालवनही कठीण झालेला आहे. त्यांनी माणुसतीचा धर्म पाळला माणुसकीचा धागा विणला त्याच ताटकेंना माणुसकीचे दर्शन घडणार का भटक्यांच्या मदतीसाठी कोणी पुढे येणार का असाच प्रश्न ताटके त्यांच्या नजरेतून दिसतोय. आपल्या मतदारसंघातील लोकांसाठी आपल्या कार्यकर्त्यांसाठी ज्यांनी लाखो करोडोंचा खर्च केला त्यांच्यावर आज अनवाणी चालण्याची वेळ आली आहे. आता मात्र फाटके कपडे घालून फिरण्याची वेळ आली आहे .त्याला कारण ठरली आहे ती राजकारणाची वाट . ही वाट धरली नसती तर कदाचित आज ताटकांचे दिवस काही वेगळे असते.वरील घटनाचा आपण विचार केला तर चांगले मीं मी म्हणणारे निवडणूक हरले जातं असतात. शेवटी ज्याने त्याने स्वतःच सखोल पणे विचार करूनच या फंदात पडावे. वेळ गेल्यावर काही उपयोग नसतो.निवडणुक हरल्यास राजाचा रंक होऊ शकतो.' हे सुद्धा तेवढेच खरे आहे.

# नितीनजी गडकरीं जर सर्वच विरोधी पक्षांना चालत असेल;तर त्यांना बिनविरोध निवडून देण्यासाठी तत्परता दाखवावी.

गडकरींना लोकसभेची उमेदवारी मिळते किंवा नाही याबाबत विरोधकांमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चेला उधाण आले होते.परंतु त्यांना आता उमेदवारी मिळाली आहे.विरोधकांना गडकरींचे आचारविचार पटतात व एक मातब्बर नेता म्हणून भारतासह जगभरात प्रचलित आहे.त्यामुळे त्यांना बिनविरोध निवडून आणण्यासाठी संपूर्ण विरोधकांनी एकमताने तत्परता दाखविली पाहिजे व नागपूरसाठी इतिहास घडविला पाहिजे. गडकरी निवडून येतील यात दुमत नाही. परंतु संपूर्ण विरोधकांना जर गडकरी चालतात तर त्यांची निवड बिनविरोध का होवू नये असाही प्रश्न सर्वसामान्यांपुढे उपस्थित होतो. आज श्री नितीनजी गडकरींचे नाव त्यांच्या कामांच्या बळावर भारतातच नाही तर संपूर्ण जगभरात प्रसिद्ध आहे.त्यामुळेच त्यांना विकासपुरुष म्हणून संबोधले जाते.त्याचप्रमाणे देशातील तळागाळातील राजकीय पक्ष, राष्ट्रीय पक्ष, प्रादेशिक पक्ष, छोट्या–मोठ्या संघटना त्याचप्रमाणे संपूर्ण जाती धर्माचे लोक नितीनजी गडकरींना चांगल्याप्रकारे ओळखतात कारण त्यांच्या कामाची शैली, बोलण्याचा मधुरपणा, मनमिळाऊ स्वभाव, सर्वांनाच घेऊन चालने हा स्वभावगुण त्यांच्यामध्ये असल्यामुळे आज जगप्रसिद्ध झाले आहे आणि यात मुख्यत्वे करून सिंहांचा वाटा नागपुरवासीयांचा व नागपूर लोकसभा मतदारसंघातील मतदारांचा आहेयाबद्दल नागपूरवासी व नागपूरातील राजकीय पक्ष आणि पुढारी चांगल्याप्रकारे अवगत आहे.त्यामुळे नितीनजी गडकरींची कामांची ताकद काय आहे हे दाखवून देण्याची वेळ संपूर्ण राजकीय पक्षांची आहे.त्यामुळे श्री नितीनजी गडकरींसाठी संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी व पक्षांनी आपले मतभेद बाजूला सारून व त्यांची काम करण्याची शैली पाहून त्यांना बिनविरोध निवडून देण्याचे दायित्व नागपूरवासी व नागपूरीतील राजकीय पुढाऱ्यांनी ती स्विकारले पाहिजे.नागपुरवासीयांना जर खरोखरच इतिहास घडवायचा असेल तर नितीनजी गडकरीं यांना बिनविरोध निवडून आणने अत्यंत गरजेचे आहे.यामुळे देशातच नाही तर संपूर्ण जगात एक चांगला संदेश जाईल यात तिळमात्र शंका नाही.त्यामुळे संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी विकासपुरुष नितीनजी गडकरीं यांना बिनविरोध निवडून देण्यासाठी मनापासून तत्परता दाखवुन महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात एक आगळा वेगळा संदेश पोहोचला पाहिजे.

सुवर्ण महाराष्ट्र
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर



# रोगप्रतिकार शक्तिवर्धक!

## राष्ट्रीय लसीकरण दिवस विशेष

_ जगभरात कोरोना महामारीने दहशत निर्माण केल्यानंतर लसीचे महत्व अधिक ठळकपणे दिसू लागले. पण हा लसीकरण दिवस खरंतर दि.१६ मार्च १९९५पासून सुरू झाला. कोरोना काळानंतर तर या दिवसाला अधिक महत्व दिले जाते. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखातून या राष्ट्रीय लसीकरण दिनाचे महत्व जाणून घ्या.... संपादक.

बाळ जन्मल्याबरोबर अर्ध्या तासात केलेले स्तनपान म्हणजे बाळाचे पहिले लसीकरण होय. चीक घट्ट दुधासारखा असतो. त्याचा रंग लिंबाच्या रंगासारखा पिवळसर हिरवा असतो. दुधामध्ये पहिले तीन ते सहा दिवस हा चीक असतो. चीकातील रोगप्रतिबंधक शक्तीमुळे बाळाचे अनेक रोगांपासून संरक्षण होते. उदा.जुलाब, सर्दी, खोकला, कान फुटणे, पोलियो, दमा इत्यादी आजारांपासून बाळाचा बचाव होतो. हा चीक पोटात गेल्यामुळे बाळाला शौचास साफ होते आणि पोटातील काळी घाण शौचावाटे आपोआपच बाहेर पडते. चीक जरी घट्ट असला तरी पचायला तो हलका असतो. या चीकामुळे आतड्यात पाचकरस तयार होण्यास मदत होते. चीक व दुधातील अन्न घटक बाळाला पोषकच ठरतात. बालकांमधील लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या आजारांचे प्रमाण व त्या आजारांमुळे होणारे मृत्यु कमी करण्यासाठी नियमित लसीकरण कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. ऑक्टोबर १९७७मध्ये लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ व क्षयरोग या पाच आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ''विस्तारित लस टोचणी कार्यक्रम– विलटो'' सुरु करण्यात आला. सन १९८५–८६मध्ये ''सार्वत्रिक लसीकरण'' कार्यक्रम सुरू करण्यात आला. गोवर लसीचा समावेश सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमामध्ये करण्यात आला आहे. नियमित लसीकरण कार्यक्रमाच्या वेळापत्रकामध्ये हिपॅटायटिस बी या रोगाच्या लसीचा समावेश राज्यात सन २००८–०९मध्ये टप्प्याटप्याने करण्यात आला. आता ही लस सर्व जिल्हयांमध्ये लागू करण्यात आली आहे. नियमित लसीकरण कार्यक्रमात जापनीज एन्सेफलायटिस या रोगाच्या लसीचा समावेश अमरावती महानगरपालिकासहीत यवतमाळ, नागपूर, भंडारा, वाशिम, गडचिरोली, लातूर आणि बीड जिल्ह्यात करण्यात आला. महाराष्ट्रात लसीकरणाच्या वेळापत्रकामध्ये सन २०११पासून गोवर लसीच्या दुसऱ्या मात्रेचा समावेश करण्यात आला. लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या आजारांसाठी लहान बालकांचे लसीकरण, धनुर्वातासाठी गरोदर मातांचे लसीकरण सुरू झाले आहे. नियोजित सत्रांमध्ये लसीकरण करणे आरंभ झाला आहे. लसीची क्षमता टिकविण्यासाठी शितसाखळीचे व्यवस्थापन केले जाते. लसीकरणाची सुरक्षितता वाढविण्यासाठी सर्व जिल्हे व महानगरपालिका यांना एडी सिरिंजेसचा पुरवठा करण्यात येतो. जैविक वैद्यकिय कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट लावण्यात येते. वैद्यकिय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांचे नियमित प्रशिक्षण घेण्यात येते. लसीकरणानंतर उदभवणाऱ्या विपरित प्रतिक्रियांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर अन्वेषण समित्यांची स्थापना होते. लसीकरणानंतर उदभवणाऱ्या विपरित प्रतिक्रियांची माहिती नोंदविण्यासाठी ''व्हिजीफलो'' या आंतरराष्ट्रीय ग्लोबल पोस्ट मार्केटिंग सर्व्हेलन्स ऑनलाईन सॉफ्टवेअरचा वापर होतो. राज्यात नियमित लसीकरण कार्यक्रम केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येतो. लसी तसेच सिरिंजेस शितसाखळी उपकरणे व अनुदान केंद्रशासनाकडून पुरविण्यात येते. लसीकरणासाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे दिलेल्या लसीकरणाच्या वेळापत्रकाचा वापर केला जातो. आरोग्य संस्था व बाह्यसंपर्काच्या ठिकाणी ठराविक दिवशी लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात येते. लाभार्थीपर्यंत लस पोहचविण्यासाठी लसीची वाहतूक करताना शितसाखळीची गुणवत्ता अबाधित ठेवली जाते. आरोग्य व कर्मचारी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये असणाऱ्या लाभार्थींची नोंद लसीकरण रजिस्टरमध्ये करतात. लसीकरणाच्या सेवा प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून लाभार्थींना विनामुल्य पुरविल्या जातात. लसींची शितसाखळी अबाधित ठेवण्यासाठी आईसलाईन्डम रेफ्रीजरेटर, डिपफ्रीजर, कोल्ड बॉक्स व्हॅक्सीन कॅरिअर, आईस पॅक, वॉक इन कुलर आणि फ्रीजर्स अशा उपकरणांचा वापर केला जातो. पल्स पोलिओ लसीकरण मोहिम ही राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम स्वरुपात संपुर्ण राज्यात व ठराविक जिल्ह्यासह सर्वच जिल्ह्यातील अतिजोखमीच्या कार्यक्षेत्रात उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येते. इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्स– आईएपीने शिफारस केली आहे की ६ महिने ते ५ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना वर्षातून एकदा फ्लूची लस दिली पाहिजे. लसींच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी १६ मार्च रोजी राष्ट्रीय लसीकरण दिन साजरा केला जातो. हा लसीकरण दिवस १९९५पासून सुरु झाला. वातावरण बदलले की मुलांना वाहणारे नाक, खोकला आणि हलका ताप यामुळे त्रास होतो. ही एक सामान्य सर्दी आहे आणि कालांतराने बरी होईल असे पालकांना वाटते. जेव्हा ताप जास्त असतो, मुलाला श्वास घेण्यास त्रास होतो आणि खोकला वाढतो तेव्हाच ते डॉक्टरकडे जातात. या प्रकरणात खरा धोका हा आहे की बर्याच वेळा ही लक्षणे सामान्य सर्दीची नसतात. हा फ्लू देखील असू शकतो. हे समजून घेणे महत्त्वाचे आहे, की मुले इतर संक्रमित बालक किंवा प्रौढ व्यक्तीच्या संपर्कात आल्यावर त्यांना फ्लूची लागण होऊ शकते. मुलांची नैसर्गिक प्रतिकारशक्ती कमकुवत झाल्याने ते संसर्गाला लगेच बळी पडतात. म्हणून मुलांना दरवर्षी फ्लूची लस देणे आवश्यक आहे. जगभरात कोरोना महामारीने दहशत निर्माण केल्यानंतर लसीचे महत्व अधिक ठळकपणे दिसू लागले. पण हा लसीकरण दिवस खरंतर दि.१६ मार्च १९९५पासून सुरू झाला. कोरोना काळानंतर तर या दिवसाला अधिक महत्व दिले जाते. राष्ट्रीय लसीकरण दिनानिमित्त या दिनाचे महत्व जाणून घेउया. राष्ट्रीय लसीकरण दिवस दरवर्षी दि.१६ मार्च रोजी साजरा केला जातो. देशात दि.१६ मार्च १९९५ रोजी तोंडावाटे पोलिओ लसीचा डोस सुरु करण्यात आला. या दिवसाने संपूर्ण देशात लसींच्या महत्त्वाविषयी जनजागृती केली. म्हणून हा दिवस भारत सरकारच्या पल्स पोलिओ मोहिमेसाठी साजरा केला जातो. देशातून पोलिओचे उच्चाटन करण्यासाठी हा सरकारचा पुढाकार होता. कार्यक्रमानुसार ० ते ५ वर्षे वयोगटातील मुलांना पोलिओचे दोन थेंब दिले जातात. जगात पोलिओ निर्मूलनासाठी दोन महत्त्वाच्या लसीकरण पद्धती वापरल्या जातात. पहिली पद्धत जोन्स साल्क यांनी सन १९५२ साली यशस्वीरित्या शोधून काढली. या पद्धतीत लस म्हणजे मेलेल्या जीवाणूंचा संच वापरला गेला. हे जीवाणू शरीरात स्नायूमार्फत टोचून दिले जात. नंतर अल्बर्ट सबिन यांनी मुखामार्गे लसीकरणाची पद्धत शोधून काढली. पोलिओचे जीवाणू कोणत्याही प्राण्याच्या शरीरामध्ये फार वेळ राहू शकत नाहीत कारण त्या प्राण्याची रोग प्रतिकार शक्ती त्या पोलिओ विषाणूंना पळवून लावते व त्यामुळे पोलिओचे कायम स्वरूपी निश्चित असे वाहक निसर्गात नाहीत. या गोष्टीमुळे आपल्या हे लक्षात आले कि मनुष्यांतर्गत पोलिओ विषाणूंचा होणारा प्रसार रोखणे, ही जागतिक पोलिओ निर्मुलनातील सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. अशा या दोन लसीकरण पद्धतींचा अवलंब केल्यामुळे आज जगातील सगळ्या देशांमध्ये पोलिओ रुग्णांची संख्या कमी झालेली आहे. याचा पुरावा हा कि गेल्या २० वर्षांमध्ये साडे तीन लाखापासून दीड हजार रुग्णांपर्यंत पोलिओमध्ये घट झालेली आहे. !! राष्ट्रीय लसीकरण दिनाच्या सर्व बालकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

सुवर्ण महाराष्ट्र
- संकलन व शब्दांकन -
श्री के. जी. निकोडे- 'केजीएन'
मु. पिसेवडधा जि. गडचिरोली.
व्हा. नं. ७४१४९८३३३९.



हे दैनिक पत्र मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक अंकुश हिम्मतराव कडू यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर्स, मु.पो. खानापूर ता. ता. कारंजा लाड जि. वाशिम–४४४१०५ येथे मुद्रीत करुन दैनिक सुवर्ण महाराष्ट्र कार्यालय, विसावा हॉटेल, आंबेडकर चौक, कारंजा ता. कारंजा लाड जि. वाशिम –४४४१०५ येथे प्रसिद्ध केले. भ्रमणध्वनी – ९६२३१९४२२६ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत)

# किनवट / माहूर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी दोन हजार कोटीची विकास कामे- आ. भीमराव केराम

**सुवर्ण महाराष्ट्र / माहूर** – किनवट माहूर तालुक्यात विकासाचा अनुशेष भरून करण्यासाठी गेल्या चार वर्षात दोन हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी आणला.अशी माहिती आ.भिमराव केराम यांनी दि.१४ मार्च रोजी स्थानिक विश्रामगृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.किनवट माहूर चे आमदार भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला मेळाव्यानिमित्त विश्रामगृहात बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर आ. भीमराव केराम यांनी पत्रकार परिषद घेऊन चार वर्षात झालेल्या विकास कामांचा लेखाजोखा पत्रकारासमोर मांडला.

यावेळी बोलताना आ. भीमराव केराम यांनी हरितक्रांती घडविण्याचा माझा मानस असल्याने पैनगंगा नदी पात्रामध्ये तीन बंधारे मंजूर केले असून चिमटा धरणाला आधीपासूनच माझा विरोध होता आणि आजही विरोध कायम असल्याचे त्यांनी सांगितले. होणाऱ्या तीन बंधाऱ्यामुळे माहूर तालुका सुजलाम सुफलाम होऊन हरितक्रांती घडेल यात शंका नाही. असे सांगून प्रत्येक मतदारसंघातील प्रत्येक गाव, खेडेवाडी व तांड्यात रस्ते, नाल्या, सभामंडप, समशानभूमी आदी कामे झाल्याचे सांगितले. अनेक वर्षे रखडलेल्या



मनीराम थड प्रकल्पातील पाणी पाईपलाईन द्वारे शेतकऱ्यांना पोहोचविण्याच्या उद्देशात मी सफल झालो असल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. डोंगरदऱ्यात दुर्गम भागात वसलेल्या खेड्यापाड्यांना मुख्य रस्त्याशी जोडण्यासाठी तसेच वन विभागाच्या हद्दीतून गेलेल्या रस्त्यांना मंजुरी मिळवून देत सर्वच रस्त्यांच्या कामाला सुरुवात झालेली असून लवकरच तालुक्यातील प्रत्येक खेडे मुख्य रस्त्याशी जोडले जातील असे त्यांनी स्पष्ट केले. केंद्र आणि राज्य सरकारच्या लोकहितकारक योजना नागरिकापर्यंत पोहोचविन्यासाठी कार्यकर्ते रात्रंदिवस मेहनत घेत असून महिला साठी असलेल्या सर्व योजना १००% राबविण्याच्या सूचना अधिकाऱ्यांसह पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्याने आज पक्षामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांचा प्रवेश होत असल्याची बाब सुखद असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.जल जीवन मिशन अंतर्गत माहूर तालुक्यातील ५१ गावात ६२ कोटी रुपये खर्चून नळ योजनेची कामे सुरू असून संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांना सक्त सूचना देऊन ही कामे पुढील महिन्यात पूर्ण करण्याचे सांगण्यात आले असून गावकऱ्यांनी आपल्या कामात गावात होणारे ही कामे अंदाजपत्रकांनुसार करून घ्यावीत, यात कसूर करणाऱ्या कंत्राटदारांना सोडणार नाही असा सज्जड दमही त्यांनी दिला. शबरी माता घरकुल योजनेअंतर्गत किनवट/ माहूर तालुक्यात ५००० घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे,लवकरच आणखी ५००० घरकुले प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले.पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली जागतिक पातळीवर देशाने मोठी भरारी घेतल्याने तसेच न भूतो न भविष्यती असे विकास कामे होत असल्याने परिसराला न्याय देता यावा यादृष्टीने माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी पक्षप्रवेश केल्याने कार्यकर्त्यांत चैतन्य निर्माण झाले असून पक्ष मोठी भरारी घेईल यात शंका नाही असेही त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी भाजपाचे तालुका अध्यक्ष कांतराव घोडेकर, युवानेते ॲड.रमण जायभाये, नगरसेवक सागर महामुने, अनिल वाघमारे, जीवन अग्रवाल, संतोष तामखाने, पंढरीनाथ ठाकरे, विनायक मुसळे, तुकाराम फड, रामकिसन केंद्रे, मनीष राठोड, अजय पवार, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष स्वाती आडे, पद्मा गिऱ्हे,अर्चना दराडे, निर्मला जोशी, वनिताताई पाटील यांचेसह मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्ते पत्रकार उपस्थित होते.

# शासकीय अनास्थेपाई मृत्यूला कवटाळणाऱ्या शेतकऱ्यांप्रती संवेदना जपण्यासाठी एक दिवशीय अन्नत्याग आंदोलन

## साहेबराव कर्पे पाटील शेतकरी कुटुंब आत्महत्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित आंदोलनात शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

**मानोरा (ता.प्र.)**– शहरातील तहसील कार्यालय परिसरामध्ये येत्या १९ तारखेला देशातील पहिल्या शेतकरी आत्महत्येच्या नोंद झालेल्या कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त करण्याकरीता बहुजन युवा संघर्ष वाहिनी तर्फे एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात येत आहे. सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणा,शेतमालाला हमीभाव नाही, अवकाळी पाऊस आदी कारणांनी कंटाळून गतवर्षीच्या जानेवारी ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत २४७८ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले असल्याची अधिकृत आकडेवारी खुद्द राज्य शासनाने जाहीर केली असून सर्वाधिक आत्महत्या अमरावती व मराठवाड्यात झाल्याच्या उघड

> देशातील सर्वाधिक प्रगत राज्यात शासकीय आकडेवारीनुसार जर अडीच हजार शेतकरी आत्महत्या केवळ दहा महिन्यात होतात तर शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंब करपे पाटील यांच्या मृत्यूपासून आतापर्यंत देशभरात किती अन्नदात्यांचे बळी गेले असतील याची आकडेमोड कुठल्याही संवेदनशील मनाला घायाळ करणारी असल्याने बळीराजाच्या आत्मघाताला पायबंध बसावा आणि शेतकरी हिताचे धोरणे आखले जावीत यासाठी एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात येत आहे.
>
> **– एड.बळीभाऊ राठोड**

झाले आहे. दि.१९ मार्च १९८६ रोजी चिलगव्हाण या यवतमाळ जिल्ह्यातील साहेबराव करपे यांनी शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणे आणि शेतकरी विरोधी ह्या धोरणामुळे शेतकऱ्यांना सातत्याने येणारे अपयश हेच कर्पे पाटील यांच्या कुटुंबाच्या आत्महत्याचे मुख्य सूत्र होते. साहेबराव करपे पाटील त्यांची पत्नी मालती, अनुक्रमे तीन मुली विश्रांती, मंगला,सारिका व मुलगा भगवान ह्यांनी वर्धा जिल्ह्यातील दत्तपूर आश्रमात विषयुक्त अन्न प्राशन करून आपले जीवन असामूहिकरीत्या संपविले. या दुर्दैवी घटनेला यावर्षी ३८ वर्षे पूर्ण होत असून यानिमित्ताने अन्नदात्यासाठी एक दिवशीय अन्नत्याग आंदोलन बहुजन युवा संघर्ष वाहिनी द्वारे बळीभाऊ राठोड यांच्या नेतृत्वात तहसील प्रांगणात सकाळी दहा ते पाच वाजे पर्यंत मानोरा येथे आयोजित करण्यात आले आहे. एकदिवसीय अन्नत्याग आंदोलनाला शेतकरी संघटनेचे राज्य प्रवक्ते मनीषभाऊ जाधव, गजानन अहमदाबादकर, विठ्ठलराव घाडगे, नामा बंजारा, राजकुमार दिघडे, संतोष जाधव, प्रा. जय चव्हाण, पंकजपाल महाराज, मनोहर राठोड हे मार्गदर्शन करणार आहेत तर नामदेवराव तायवाडे, प्रकाश राठोड, रामराव चव्हाण, प्रेम महाराज, भानुदास जाधव, भारत जाधव,नामदेव महाराज, दादाराव राठोड, विवेक आडे, प्रकाश चव्हाण, प्रदीप देशमुख, दारासिंग जाधव ज्ञानेश्वर राठोड आदि मान्यवर व असंख्य सहृदयी शेतकरी उपस्थित राहणार आहेत.

# जि.प.विदयालय कामरगावचे विद्यार्थी इस्रोला भेट देण्यासाठी बंगळुरूला रवाना

**कामरगाव** – जिल्हा परिषद विदयालय कामरगावचे विद्यार्थी इस्त्रोला भेट देण्यासाठी आज बंगळुरूला रवाना झाले असून समग्र शिक्षा अंतर्गत राष्ट्रिय अविष्कार अभियान सन २०२३-२४ या अंतर्गत 'एक्सपोजर व्हिजिट आऊटसाईड स्टेट' उपक्रमान्वये जिल्हा परीषद विद्यालय कामरगाव येथिल कु.राधिका विकासराव देशमुख,कु.नेहा संदिप भारस्कर,कु.वैष्णवी अरुण ठाकरे,सोहम परिमल गांजरे,यश प्रमोद वानखेडे,सुमित जनार्दन घोडे या सहा विद्यार्थ्यांसह शिक्षिका कु.नीता तोडकर यांची निवड झाली आहे.या सहा विद्यार्थ्यांचे एन.एम.एम.एस. परीक्षेतील यश तसेच राज्य विज्ञान प्रदर्शनीतील यश यातून ही निवड झाली आहे.



समग्र शिक्षा अंतर्गत या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या विचाराची देवाण घेवाण,सांस्कृतिक वृध्दीकरण व आनंददायी शिक्षण प्राप्त करण्यास मदत होईल तसेच विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात सुध्दा वृध्दी होईल.

आपल्या जिल्हयातील विद्यार्थ्यांना बंगळुरू व परिसरातील शैक्षणिक कार्य असणाऱ्या शाळा / संस्था, ऐतिहासिक स्थळे, विज्ञान केंद्रे, वस्तु संग्रहालये, प्राणी संग्रहालये, तारांगण,वारसा इमारती, माहिती प्रसार केंद्रे,धरणे मोठे तलाव इत्यादी अभ्यासता येतील. इतर राज्यामध्ये शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलांचे निरिक्षण करणे,अभ्यास करणे व आपल्या जिल्हयात त्याचा उपाययोजना करणे हा महत्वाचा हेतू यामागे आहे. त्यासाठी जिल्हयातील ८ शाळेतील ४५ विद्यार्थी व ८ शिक्षक व जिल्हास्तरावरील १ अभ्यास भेट प्रमूख व १ सहाय्यक प्रमूख असे एकूण ५४व्यक्ती बंगळुरू येथे भेट देणार आहेत.जिल्हा परिषद विद्यालय कामरगाव येथील विद्यार्थी हे मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. वाशिम वैभव वाघमारे,प्राथमिक शिक्षणाधिकारी राजेंद्र शिंदे, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, कारंजा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने, जिल्हा परिषद विद्यालय कामरगावचे मुख्याध्यापक सुरेश राठोड पर्यवेक्षक विकास रुईकर पर्यवेक्षक गोपाल खाडे यांच्या मार्गदर्शनात या उपक्रमात पंधरा मार्च ते वीस मार्च असे सहा दिवस सहभागी होत आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची यश पाहता त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे



# कापड लाईन येथील श्रीकांत स्वीट मार्ट आगीमध्ये जळून खाक

## जीवित हानी नाही परंतु लाखोंचे मात्र नुकसान

**दैनिक सुवर्ण महाराष्ट्र/ पुसद** – जुना सरकारी दवाखाना जवळील कापडलाईन येथे संध्याकाळी साडे सहाच्या सुमारास श्रीकांत स्वीट मार्ट दुकानाला आग लागल्याने हे दुकान जळून खाक झाले आहे.

नगीना चौक शेजारील सुनील पापीनवार यांच्या श्रीकांत स्वीट मार्ट या दुकानाला आग लागल्याने आगीमध्ये जळून खाक झाले आहे. दुकानातुन एकाएकी धूर निघत असल्याचे लक्षात येताच आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी दुकानाकडे धाव घेऊन लागलेली आग विझवण्याचा प्रयत्न केला. तसेच नगरपरिषद ला माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी व जवान दाखल होऊन त्यांनी शर्तीचे प्रयत्न केल्याने आगीवर नियंत्रण मिळून त्यांना आग विझवण्यात यश आले आहे .

या आगीमध्ये कोणतीही जीवित हानी झाली नाही परंतु श्रीकांत स्वीट मार्ट या दुकानाचे लाखोचे नुकसान झाले आहे. मागील आठवड्यात सुद्धा अशाच प्रकारे आंबेडकर चौक येथे आठ ते नऊ दुकान जळाले होते आजच्या घटनेमुळे उन्हाळा लागण्याच्या सुरुवातीलाच दुकानाला आग लागण्याची मालिका सुरूच झाल्याचे निदर्शनात येत आहे. आग लागलेल्या घटनास्थळी पुसद नगर परिषदेचे मुख्याधिकारी अभिजीत वायकोस पुसद नायब तहसीलदार गणेश कदम पुसद पोलीस स्टेशनचे ठाणेदार उमेश बेशरकर इत्यादींनी घटनास्थळाला भेट दिली आहे.

# कुरळी येथील त्या कामांची सखोल चौकशी करा,अन्यथा आमरण उपोषण

## ग्रामपंचायत सदस्य कांचन बोईनवाड यांचा निवेदनाद्वारे इशारा

**ढाणकी(प्रतिनिधी)**–मौजे कुरळी येथे अहिल्याबाई होळकर सौंदर्यकरण करिता चार लाखाच्या निधीचे काम सुरू असून, ते काम एस्टिमेटनुसार करण्यात यावे. सदर काम हे निकृष्ट दर्जाचे होत आहे. तसेच जलजीवन मिशन अंतर्गत कुरळी गावातील नळ व पाईपलाईनचे काम सुद्धा अतिशय निकृष्ट दर्जाचे सुरू असून, दोन्ही कामाची सखोल चौकशी करून काम हे गुणवत्तापूर्ण करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन ग्रामपंचायत सदस्य कांचन अनंता बोईनवाड यांनी, गटविकास अधिकारी पंचायत समिती उमरखेड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यवतमाळ यांना दिले आहे. याचबरोबर सरपंच सीमा प्रदीप राठोड ह्या कधीही ग्रामपंचायत कार्यालयात येत नसून, कुठल्याही ग्रामपंचायतच्या योजना राबविण्यासाठी त्यांना कुठलीही माहिती नाही. सरपंच महिला ही कधीही मासिक सभेला हजर सुद्धा राहत नाही. तसेच कुठल्याही प्रोसिडिंग रजिस्टरवर तिची सही सुद्धा नाही तिची सही तिचे पती प्रदीप राठोड करीत असतात. ओबीसी घरकुलाचे लाभार्थ्याच्या यादीमध्ये सरपंच यांचे पती व ग्रामपंचायत चा एक सदस्य या दोघांनी मिळून, मूळ ओबीसीच्या यादीमध्ये फेरबदल केला असून प्रत्येकी तीन हजार रुपये वसुली केली आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी. तसेच जलजीवन चे काम ठेकेदार व सरपंच यांचे पती व ग्रामपंचायतचा एक सदस्य यांनी गावकऱ्यांना तथा ग्रामपंचायत च्या बाकीच्या सदस्यांना विश्वासात न घेता आपल्या मनमानी कारभाराने काम करत आहेत. असे आरोप सदर निवेदनामध्ये कुरळी ग्रामपंचायत सदस्य कांचन अनंता बोईनवाड यांनी केली आहे. कुरळी येथील सदर संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठां मार्फत गांभीर्याने चौकशी व्हावी. होणारे काम हे इस्टिमेट नुसार व्हावे, आणि दोषींवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. असे न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा कांचन अनंता बोईनवाड यांनी निवेदनातून दिला आहे.

# वाढिव कर कमी करा !

**सुवर्ण महाराष्ट्र /दिग्रस** – नगर परिषदेने वाढविलेल्या आवाढव्य कर आकारणी विरोधात आज बुधवार, १३ मार्च पासून आमरण उपोषणास सुरुवात झाली असून दिग्रस बंद नंतर आता या दुसर्या आंदोलनाला दिग्रसकर नागरिकांकडून समर्थ दिले जात आहे. मुख्याधिकारी माधुरी मडावी यांनी मागील मालमत्ता कराच्या चारपट कर वाढून तो सक्तीने वसूल करण्यास सुरुवात केल्याने आम्ही दिग्रसकर या बॅनर खाली मुख्याधिकारी मडावी यांची भेट घेऊन गुरुवार, २२ फेब्रुवारीला मॅडम कर कमी करा अशी विनंती करीत निवेदन दिले, तर महाविकास आघाडीने शनिवार, २४ फेब्रुवारीला नागरीकांनी संयम बाळगा असे आवाहन पत्रकार परिषदेच्या मार्फत केले होते.बुधवार २८ फेब्रुवारीला ना.संजय राठोड यांनी नगर विकास मंत्रालयाकडून वाढिव करावर स्थगिती आणली तरी सुध्दा मी करवाढ केलीच नाही असे सांगून खुद्द ना.संजय राठोड यांच्या स्थगिती पत्रालाही मडावी यांनी गांभीर्याने घेतले नाही, आम्ही दिग्रसकर यांनी यवतमाळ




जिल्हाधिकाऱ्यांना स्थगीती पत्राची अंमलबजावणी करा या संदर्भात ४ मार्चला निवेदन दिले.मात्र करवाढ कमी झाली नाही उलट नगर परिषदेने सक्तीने वसूली चालू ठेवली मात्र आता पुरे म्हणत सोमवार ११ मार्चला दिग्रस बंद पुकारला कधी नव्हे तो बंद १०० टक्के यशस्वी झाला.याचाच अर्थ असा की लोकांना करवाढ हि मान्य नाहीच परंतू याही आंदोलनाने परिणाम झाला नसल्याने आजपासून आमरण उपोषणाला सुरुवात झाली असून उबाठा गटाचे माजी उपनगराध्यक्ष अजिंक्य मात्रे , पुनम पटेल, केतन रत्नपारखी, काँग्रेसचे अरबाज धारीवाला व राष्ट्रवादीचे भारत पाटिल यांनी ग्राम दैवत संत श्री घंटीबाबा यांचे दर्शन घेऊन, नारळ फोडून आमरण उपोषणाला स्थानिक शहिद स्मारक येथून सुरुवात केली आहे. थकीत रकमेवर चक्रवाढ व्याज रद्द करावा, कोणत्याही परिस्थीती नळ कनेक्शन बंद करून उन्हाळ्यात पाण्यापासुन नागरिकांना वंचीत करू नये, कर मागणी देयकात न.प. अधिनियम १९६५ कलम १६९ नुसार ३० दिवसांत अपील करून करण्याची अट नमुद आहे पण अपील समिती गठीत करणे शक्य नाही. तरी अपील समीती चे रितसर गठण झाल्या शिवाय नविन अवाढव्य कर आकारणी करू नये. तुर्त स्थगीत करावी अशी उपोषण कर्त्यांची मागणी असून शहरातील अनेक मंडळींकडून समर्थन दिले जात आहे.

# ढाणकी ते सोईट निकृष्ट रस्त्यास जबाबदार असणाऱ्या कंत्राटदारांची गिनीज बुकात नोंद करा- मनसेची मागणी



**ढाणकी(प्रतिनीधी: )**– ढाणकी ते सोईट रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सुरू असुन अंदाजे ८० लाख रु. खर्च करून २ किलो मीटर रस्त्याची दुरूस्ती सुरू करण्यात आली होती. परंतु, रस्त्यावरील गिट्टी अल्पावधीतच बाहेर पडली आहे. यात डांबराचे प्रमाण नसल्या सारखेच आहे. उघडया पडलेल्या गिट्टीमुळे सदर रस्त्यावर अपघाताचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे. अनेकांना आपला जीव मुठीत धरून या रस्त्यावर प्रवास करावा लागत आहे. शेतकरी, शेतमजुर, प्रवासी



विदयार्थी आणी रूग्ण यांना प्रचंड शारीरीक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. संबंधीत कंत्राटदाराने अर्धवट काम केले असुन मागील २ महिन्यापासुन रस्त्याची दुरुस्ती बंद आहे. संबंधीत ठेकेदाराच्या मुजोरपणापुढे आपले सार्वजनीक बांधकाम विभाग हतबल झाले की काय ? निकृष्ट रस्त्यांच्या कामास जबाबदार असणा-या कत्राटदारांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद करून त्यांचा राष्ट्रपतीच्या हस्ते सत्कार करण्यात यावा, अशी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची आग्रही मागणी असुन, या निकृष्ट रस्त्यास जबाबदार असणारे अधिकारी यांचा मनसे प्रतिकात्मक शाल श्रीफळ देवुन सत्कार करणार आहे.

तरी ८ दिवसांच्या आत सदर रस्त्याची नव्याने दुरूस्ती सुरू न केल्यास मनसे स्टाईल चक्का जाम आंदोलन करण्यात येईल.या अशयाचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने देण्यात आले. या प्रसंगी जिल्हाअध्यक्ष देवाभाऊ शिवरामवार , जिल्हा उपाध्यक्ष देविदास शहाणे , उमरखेड तालुका अध्यक्ष सादिक शेख , महाराष्ट्र नवनिर्माण विधार्थी सेना जिल्हा अध्यक्ष अभिजित नानवटकर, सिधार्थ घुघरे, हिरासीह चव्हाण , मुन्ना रहेमान , मुकुंद जोशी , यांच्या सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थीत होते.

> या रस्त्यावर खूप अपघात होत असून संबंधित ठेकेदारावर कायदेशीर कार्यवाही करुन त्याला ब्लैक लिस्ट करण्यात यावे.
>
> **देवा शिवरामवार**
> **मनसे**
> **जिल्हाअध्यक्ष**
> **यवतमाळ**

# मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येणे काळाजी गरज – प्रो. अनिल काळबांडे

**दैनिक सुवर्ण महाराष्ट्र /पुसद –** आजच्या युगात मराठी भाषेची सातत्याने होणारी गळचेपी थांबविण्यासाठी , तिच्या संर्वधनासाठी मराठीतील सर्वच समूहाने एकत्र येण्याची गरज असल्याचे प्रतिपादन साहित्यिक प्रोफेसर डॉ अनिल काळबांडे यांनी केले ते स्थानिक फुलसिंग नाईक महाविद्यालयात, मराठी भाषा अभ्यास मंडळाच्या वतीने आयोजित , 'लेखक आपल्या भेटीला ' या उपक्रमांर्तगत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ . बी .बी . पाढेण तर विचारपीठावर शारीरिक शिक्षण संचालक डॉ . प्रदीप इंगोले , मराठी विभागप्रमुख डॉ प्रल्हाद वावरे , नाट्य कलावंत, दिग्दर्शक प्रा विलास भवरे , डॉ . अनिता कांबळे उपस्थित होते .प्रारंभी



फुलसिंग बापू नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर डॉ प्रदीप इंगोले यांनी , मानवी जीवनात मानवी मूल्यांची उपयुक्तता या विषयावर मार्गदर्शन केले . आपल्या प्रास्ताविकतेतून गझलकार प्रा . महेश हंबर्डे यांनी , डॉ अनिल काळबांडे यांची 'हुंकार ' कवीता बी. एस्सी भाग १ च्या अभ्यासक्रमात असल्याने , प्रत्यक्ष लेखकच आपल्या भेटीला ' हा उपक्रम राबवून त्यांनी डॉ काळबांडे यांच्या साहित्य प्रवासाचा परिचय करून दिला . आपल्या मार्गदशनात ,डॉ काळबांडे यांनी, आपल्या साहित्यनिर्मितीची प्रक्रिया सांगून प्रत्येक माणसांमध्ये कवी लेखक दडलेला असतो त्यासाठी त्याने व्यक्त होणे गरजेचे आहे . आजच्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये मराठी भाषा वाचवणे हे आपल्या सर्वच जगभरात राहणाऱ्या मराठी भाषिकासमोर आव्हान उभे आहे. त्यासाठी जास्तीत जास्त व्यवहारांमध्ये आपण मराठी भाषेचा वापर केला पाहिजे,मराठी भाषेतील वेगवेगळे प्रकार जर एकत्र आले तर मराठी भाषेला भविष्य आहे अन्यथा इतर भाषेसारखी तीही काळाच्या पडद्याआड जाण्याची भीती त्यांनी यावेळी व्यक्त केली.

आपल्या सुंदर आवाजात त्यांनी आपल्या वेगवेगळ्या कविता सादर केल्या .यावेळी प्रा . वावरे , प्रा . भवरे , प्रा . हंबर्डे यांनी आपापल्या काव्यरचनाही सादर केल्यात . आपल्या अध्यक्ष भाषणातून डॉ . पाढेण यांनी , मराठीच्या भाषेची गोडी ही अमृताला ही पैजा जिंकणारी आहे तेव्हा तिचं संरक्षण आणि प्रचार करणे ही सर्वांची गरज असल्याचे प्रतिपादन केले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा डाके ,स्नेहा महामुने तर आभार पलक चव्हाण हिने मांडले.

# निंबा येथे जल जीवन मिशन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**सुवर्ण महाराष्ट्र /दिग्रस –** दिग्रस तालुक्यातील निंबा ग्राम पंचायत येथे महाराष्ट्र शासन राज्य व पाणी व्यवस्थापन विभाग व जिल्हा परिषद यवतमाळ व साई प्रेम संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने जलजीवन मिशन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमांमध्ये जलजीवन मिशनचे उद्देश घटक व सद्यस्थिती परिचलन व देखभाल दुरुस्ती ग्राम आरोग्य पाणीपुरवठा समितीची जबाबदारी व भूमिका आपत्ती व्यवस्थापन पाण्याचे स्रोत हवाने व संधी पाणी तपासणीच्या पद्धती व संरक्षण सदर विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांनी जीवन आवश्यक पाण्याचा चांगल्या पद्धतीने वापर करून पाण्याचा चांगल्या पद्धतीने नियोजन करावे भविष्यकालीन पाण्याचा सखोल




अभ्यास करून पाण्याला महत्व द्यावं याकरिता साई प्रेम संस्थेने पाण्याचा व्यर्थ नासोडा नाही झाला पाहिजे याकरिता संपूर्ण महाराष्ट्रभर प्रशिक्षणाच्या माध्यमातून जल जीवन मिशन सरतोपरी प्रयत्नशील आहे. तसेच निंबा ग्रामपंचायत अंतर्गत पुढाकार घेऊन या प्रशिक्षण कार्यशाळासाठी अकरा गावाचे सरपंच जलसुरक्षा पाणीपुरवठा सदस्य हजर होते कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी मनीष बनसोड समाजशास्त्रतज्ञ. जल जीवन मिशन व अशोक लक्ष्मण पवार. यशदा पुणे. करुणा निलेश नरोटे. यशदा पुणे. यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्ञान सिंग रतन चव्हाण सरपंच निंबा व प्रमुख पाहुणे म्हणून नितीन इंगोले सरपंच देवारवाडा व नंदाताई खकाळे सरपंच साखरी तसेच निंबा गावाचे ग्रामसेवक डी. बी. डेरे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वी साठी पुंजाजी देशमुख जिल्हा समन्वयक एम. बी. एस. व संस्थेचे अध्यक्ष भानवे साहेब. यांनी कार्यक्रम यशस्वी केला.

# शिक्षकांनी बदलत्या जगासोबत आपले ज्ञान वाढवणे गरजेचे– उपेंद्र पाटील

## शिक्षकांच्या क्षमता वृद्धी प्रशिक्षणाचा समारोप

**मानोरा( ता.प्र.)–** आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानातिक या युगात विविध क्षेत्रात मोठे बदल झाले आहे. अशा बदलत्या जगासोबत शिक्षकांनीही अपडेट होऊन आपले ज्ञान वाढविणे गरजेचे आहे. भविष्यात शिक्षण प्रणालीत मोठा बदल होत आहे. असे प्रतिपादन माधवराव पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक उपेंद्र पाटील यांनी केले.

इयत्ता नववी ते बारावीच्या शिक्षकांचे तालुका स्तरीय क्षमता वृद्धी प्रशिक्षण (दुसरा टप्पा) दिनांक १२ मार्च पासून जिल्हा परिषद शाळा शिवाजीनगर धामणी (मानोरा) येथे सुरू होते.१४ मार्च रोजी या प्रशिक्षनाचा समारोप झाला. या प्रसंगी अध्यक्ष स्थानाहून ते बोलत होते.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था मार्फत शैक्षणिक गुणवत्ता वृध्दींगत करण्यासाठी संपूर्ण राज्यात वैविध्य पूर्ण उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येते आहे.



या धोरणातील तरतुदी नुसार शिक्षणाचे अध्ययन,व्यावसायिक विकास होऊन विद्यार्थी प्रगत होण्यासाठी हे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी शेंदूरजना येथील शिक्षक रंगे सर, प्रशिक्षक देविदास वानखडे, जावेद खान,नीलेश भेंडे ,विठ्ठल उचित,अनिकेत जिरापुरे, अमोल भगत,दिलीप डोळस, विषय साधन व्यक्ती चंदन राठोड, दीपक ठाकरे , किरण चवरे यांची उपस्थिती होती. यावेळी काही शिक्षकांनी यांनी आपले प्रशिक्षणातील अनुभव कथन केले. माध्यमिक शिक्षकांची क्षमता वृध्दी होण्यासाठी हे प्रशिक्षण लाभदायक असून याचा फायदा शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी कारावा. असे व्यक्त केले.अध्यक्षीय उपेंद्र पाटील म्हणाले की,प्रशिक्षणात सर्व तज्ञ मार्गदर्शन यांनी सोप्या भाषेत विविध विषय समजावून सांगितले. नवीन शैक्षनिक धोरण यामध्ये कशा प्रकारे बदल आहेत याची माहिती दिली.प्रशिक्षणार्थी यांनी मिळालेली माहिती शाळा स्तरावर पोहचून अध्ययन अध्यापनात त्याचा वापर करावा. असे सांगितले. भोजन,चहा ही व्यवस्था उत्तम होती. तसेच देविदास वानखडे व उपेंद्र बाबाराव पाटील यांनी समारोपीय कार्यक्रमात गीत गायन करून प्रशिक्षणार्थींचे मनोरंजन केले.यावेळी संचलन अनिकेत जिरापूरे यांनी केले. प्रशिक्षणास माध्यमिक,उच्च माध्यमिक शिक्षक उपस्थित होते.



# अनसिंग येथे वार्ड दोनमध्ये पाणीटंचाई; ग्रामपंचायतचे दुर्लक्ष

## पाणीपुरवठा सुरळीत करा अन्यथा ग्रा.पं. वर मनसेचा घागर मोर्चा – यश चव्हाण

वाशिम – उन्हाळ्याची चाहुल लागताच तालुक्यातील ग्राम अनसिंगमधील वार्ड २ मध्ये पाणीटंचाईचा भडका उडाला असून महिलांना अनेक त्रासाचा सामना करावा लागत आहे. येत्या चार दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करा अन्यथा ग्रामपंचायतवर महिलांचा घागर मोर्चा नेण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवा नेतृत्व यश ठाकरे यांनी महिलांच्या उपस्थितीत १५ मार्च रोजी ग्रा.पं. सरपंच व सचिवांना दिलेल्या निवेदनाव्दारे दिला आहे.निवेदनात नमूद आहे की, अनसिंग शहरातील वार्ड क्रमांक दोन मध्ये पाणीपुरवठा सुरळीत नसल्यामुळे महिलांना अनेक त्रासांना समोर जावावे लागत आहे. मात्र अनसिंग ग्रामपंचायतचे याकडे दुर्लक्ष होतांना दिसत आहे. वार्डातील नागरीकांना केवळ पाचच मिनिटे पिण्याचे पाणी मिळत आहे. त्यामुळे ग्रामस्थांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे त्यांना नाहक आर्थिक भुर्दंड पडत आहे. याबाबत महिलांनी अनेक वेळा ग्रामपंचायत कार्यालयाला तक्रारी देवून सुद्धा ग्रामपंचायतचे याकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे येत्या चार दिवसात पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुढाकारातून ग्रामपंचायत कार्यालयावर महिलांचा घागर मोर्चा काढण्यात येईल असा इशारा यश चव्हाण यांनी दिला आहे. यावेळी माजी सरपंच विठ्ठल सातव, राष्ट्रीय सुरक्षा मंचचे चंद्रकांत ठाकरे, ग्रा.पं. सदस्य गजानन कड, मनसेचे अनंता ढोके, वैभव सातव तसेच अनेक महिला उपस्थित होत्या.

# मरसुळ येथे ग्राम स्वच्छता अभियान

**दैनिक सुवर्ण महाराष्ट्र ( प्रतिनिधी)**

**पुसद –** तालुक्यातील मरसुळ येथे संत बाळगीर महाराज स्वच्छता अभियानातुन सद्गुरू राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांच्या मार्गदर्शनाखाली मरसूळ येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे यावेळी गावातील नागरिकासह महिलानी सुद्धा मोठा प्रतिसाद देत सहभागी होऊन संपूर्ण गाव स्वच्छ केले आहे .



यावेळी सद्गुरु राष्ट्रसंत साईनाथ महाराज यांनी सामूहिक राष्ट्रगीत घेऊन आपल्या अनुयासह स्वतः हातात झाडू घेऊन ग्रामस्वच्छता अभियानाला सुरुवात करून गावातील नागरिकांना आरोग्य, शैक्षणिक महत्व, व्यसनमुक्ती, वृक्षारोपण इत्यादी विषयावर मोलाचे मार्गदर्शन करून स्वच्छतेचा संदेश दिला आहे यावेळी या अभियानात गावातील नागरिकासह महिलांनी सहभाग घेऊन आपले गाव संपूर्ण स्वच्छ केले आहे गावातील नागरिकांनी आपल्या गावासाठी थोडे परिश्रम घेऊन दर आठवड्याला गावात ग्रामस्वच्छता अभियान राबवून आपले गाव स्वच्छ ठेवण्याचा मोलाचा संदेश यावेळी साईनाथ महाराजांनी नागरिकांना दिला आहे .

राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांनी संत बाळगीर महाराज स्वच्छता अभियानातुन संपूर्ण महाराष्ट्र मध्ये गाव तिथे स्वच्छता अभियान राबवून तसेच त्यांनी कोरोना काळात गोरगरिबांना मोठ्या प्रमाणात अन्नदान सुद्धा केले आहे संपूर्ण महाराष्ट्रात ग्राम स्वच्छता अभियान राबवून या अभियानातून ग्रामीण भागातील नागरिकांना शैक्षणिक महत्त्व ,व्यसनमुक्ती ,वृक्षारोपण, रुग्णसेवा, अन्नछत्र , अंधश्रद्धा निर्मूलन , असे राष्ट्रीय एकात्मिक लोकोपयोगी कार्यक्रम आपल्या कृतीतून राबवित असून याचीच एक दखल नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी नुकतीच घेतली असून त्यांच्या कार्याची प्रशंशा पत्र देऊन गौरव देखील करण्यात आला आहे.

सद्गुरु साईनाथ महाराजांनी शिवनेरी गड , रायगड पदयात्रेचे आयोजन करण्यात आले असुन या पदयात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे यावेळी सांगण्यात आले आहे

# शिरपूर करंजी रस्त्यावरील दूचाकीच्या अपघातात एक ठार तर एकाची प्रकृती चिंताजनक

**सुवर्ण महाराष्ट्र/ शिरपुरजैन–** शिरपूर पासून अवघ्या एक किमी अंतरावर करंजी रस्त्यावर दोन दुचाकीत धडक होऊन झालेल्या अपघातात एक जण ठार झाला आहे, तर एकाची प्रकृती चिंताजनक आहे. हा अपघात १४ मार्च रोजी झाला.शिरपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार करंजी येथील रहिवासी फकीरा नारायण लहाने यांचे इवाही रावसाहेब श्रीनिवास आखाडे (वय ७०) रा.डोणगाव ता. मेहकर हे करंजी येथून डोणगाव येथे जात असताना शिरपूर ते करंजी रोडवर असलेल्या एका रसवंती जवळ त्यांची मोटारसायकल पंक्चर झाली असता, शिरपुर येथे पंक्चर काढून त्यांच्या पत्नीला घेण्याकरिता परत रसवंतीकडे क्र.एम.एच. २८ बी.जे. ८८७८ने जात असताना



शिरपुरकडून येणाऱ्या क्र. एम. एच.३७ आर ६२११ ने मागच्या बाजुने त्यांना धडक दिली. या अपघातात डोणगाव येथील रावसाहेब आखाडे हे गंभीर जखमी झाल्याने सदर जखमीला उपचारासाठी अकोला येथील डॉ अभय पाटील यांच्या दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले. शिरपुर येथुन सायंकाळच्या दरम्यान ओम दिपक तायडे हा आपल्या दुचाकीवर अवैध देशी दारुचे बॉक्स घेवुन जात होता.या झालेल्या दुचाकीच्या अपघातात ओम दिपक तायडे दुचाकीस्वार देखील गंभीर जखमी झाला असुन, त्याची प्रकृतीही चिंताजनक आहे. तो वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत असुन वृत्त लिहेपर्यंत तो बेशुध्द होता. अपघाताची माहिती मिळताच सपोनि महेश कुचेकर ,पीएसआय रविंद्र ताले, पोहेका संदीप निखाडे, चांद रेघीवाले यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला .फकीरा नारायण लहाने रा. करंजी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिरपूर पोलिसांनी मोटारसायकल क्र.एम.एच.३७ आर ६२११ चा चालक ओम दिपक तायडे याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पीएसआय रविंद्र ताले हे करीत आहेत.

# लोकसभा निवडणूक २०२४ जनतेच्या सूचनेनुसार भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध होणार

**सुवर्ण महाराष्ट्र / माहूर –** भारतीय जनता पक्षाचे नेते पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या संकल्पनेतून भारतीय जनता पक्षा तर्फे पुढील आगामी लोकसभा निवडणुकीचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्याच्या दृष्टीने व्यापारी वर्ग,सर्व सर्वसामान्य जनतेतुन देशहितासाठी मौलिक सूचना भारतीय जनता पक्षातर्फे मागविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने विधानसभेचे लोकप्रिय आ. भीमराव केराम यांच्या हस्ते शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात नागरिकांकडून सूचना प्राप्त करून घेण्यासाठी सूचनापेटी द्वारे शहरातील व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक यांच्याशी संवाद साधून लोकसभेच्या निवडणुकीचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यासाठी आपल्या सूचना देण्यात याव्या अशी विनंती केली. यावेळी शहरातील सुज्ञ नागरिकांनी आपल्या सूचना सदर पेटीमध्ये टाकण्यात आल्या. यावेळी आ.भीमराव केराम यांचे ठिकठिकाणी शाल व पुष्पहाराने स्वागत करण्यात आले आपल्या कडून प्राप्त झालेल्या सूचना या भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र व केंद्रीय समितीकडे पाठविण्यात येणार असल्याचे आ. भीमराव केराम यांनी सांगितले



यावेळी भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष कांतराव घोडेकर, अनिल वाघमारे,सरचिटणीस अपील बेलखोडे, शहराध्यक्ष पुरुषोत्तम लांडगे, राजू मुडानकर,जीवन अग्रवाल, नगरसेवक गोपु महामुने, शुभम ठाकूर, हर्षदीप दीक्षित, संतोष तामखाने,महिला मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्या तथा महीला पत्रकार सौ. पद्माताई गिऱ्हे , जिल्हा उपाध्यक्षा रंजनाताई पाटील, शहराध्यक्षा सौ. स्वाती आडे, सौ. अर्चना दराडे, सौ, अनिता कुम्रे, महिला शहराध्यक्ष सौ. निर्मला जोशी यांचे सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# राळेगाव वडकी रोडवर सिमेंट भरलेला ट्राला झाला पलटी

**विशाल मासूरकर/यवतमाळ –** राळेगाव ते वडकी रोडवर सावंगी गावाजवळ येवती टर्निंग वर काला रात्री अंदाजे बारा वाजता सिमेंट घेऊन जानारा ट्रक क्रमांक



jh, 09,'bc , 2699 हा चंद्रपूर वरून अमरावती येथे सिमेंट घेऊन जात होता सांवगी गावाजवळ वळनार ट्रक चालकाचे नियंत्रण सुटून सिमेंट भरलेला ट्रक हा पलटि झाला यात ट्रक चालक गॅनसिंग शोगरसिंग यादव हा जखमी झाला .

प्रकुती चिंताजनक असल्याने त्याला यवतमाळ शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आले. यात ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले व सिमेंट चे सुद्धा खूप नुकसान झाले आहे.

# दिग्रस येथील डॉ. रूपेश कऱ्हाडे यांच्या महाग्रंथाचे उद्या नागपूर येथे प्रकाशन

***सुवर्ण महाराष्ट्र /दिग्रस –*** दिग्रस येथील येथील बापूराव बुटले कला , नारायणराव भट वाणिज्य व बापूसाहेब पाटील विज्ञान महाविद्यालयातील मराठी भाषा व साहित्य विभागाचे प्रमुख प्रोफेसर डॉ. रूपेश नरहरी कऱ्हाडे यांनी संपादित केलेल्या 'साहित्यसमीक्षा आणि समजचिंतन ' या डॉ.प्रकाश खरात गौरव समीक्षा महाग्रंथाचा प्रकाशन समारंभ दिनांक १६ मार्च २०२४ ला 'अर्पण सभागृह' दुसरा माळा, मोर भवन, हिंदी साहित्य संमेलन, झांशी राणी चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.



' साहित्य समीक्षा आणि समाजचिंतन ' या गौरव समीक्षा ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष म्हणून ख्यातनाम आंबेडकरवादी साहित्यिक व विचारवंत, गुरूवर्य डॉ. यशवंत मनोहर सर हे उपस्थित राहणार आहेत . प्रमुख वक्ते म्हणून डॉ. शैलेंद्र लेंडे मराठी विभाग प्रमुख रा.तु. म.नागपूर विद्यापीठ नागपूर तसेच आयु. भूपेंद्र गणवीर माजी संपादक 'दैनिक सकाळ' आवृत्ती नागपूर हे या ग्रंथावर आपले समीक्षात्मक विचार व्यक्त करणार आहेत. या गौरवपर समीक्षा महाग्रंथाविषयी संपादक म्हणून आपली भूमिका डॉ.रूपेश नरहरी कऱ्हाडे हे व्यक्त करणार आहेत. या ५५२ पृष्ठांच्या समीक्षा ग्रंथात महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठातील नामवंत साहित्यिकांनी लिहिलेले अत्यंत दर्जेदार एकूण ५१ लेख तसेच डॉ. रूपेश कऱ्हाडे यांनी डॉ. खरात सरांची घेतलेली एक दीर्घ मुलाखत आहे. या मुलाखतीत १९६० नंतरच्या आंबेडकरवादी साहित्यावर प्रखरपणे प्रकाश टाकलेला आहे. ज्यांच्या समग्र साहित्यावर हा गौरव समीक्षा ग्रंथ संपादित करण्यात आला आहे , ते प्रसिद्ध साहित्यिक , डॉ.आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी नागपूरचे माजी प्राचार्य डॉ. प्रकाश खरात हे सुद्धा आपले मनोगत व्यक्त करणार आहेत . सदर ग्रंथ मराठी विषयाच्या पीएच. डी.साठी संशोधन करणाऱ्या संशोधकांना प्रचंड उपयुक्त ठरणार आहे , हे येथे उल्लेखनीय . साहित्य निर्मिती करणाऱ्या एका पिढीचा लेखाजोखा या ग्रंथात समाविष्ट करण्यात आला आहे. सदर ग्रंथाच्या दुसऱ्या भागाचे काम सुद्धा जोमात सुरू आहे.तरी आपण सर्व मराठी साहित्य रसिकांनी, अभ्यासक, संशोधकांनी या प्रकाशन सोहळ्याला आपली उपस्थिती दर्शवावी असे आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर अँड लिटरेचर, नागपूरचे अध्यक्ष दादाकांत धनविजय आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी कळविलेले आहे .

# महाराष्ट्र जेष्ठ नागरिक संघाचा जेष्ठांचा मेळावा

बुलढाणा– फेस्कॉम बुलढणा प्रादेशिक विभागाचा उदघाटन सोहळ दि. १२ मार्च रोजी येथील गर्दे वाचनालयाच्या सभागृहता संपन्न झाला. बुलढाणा प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष प्रकाश पिंपरकर हे कार्यक्रमाच्या अध्यस्थानी होते. फेस्कॉमचे मुंबई येथील अध्यक्ष अरूण शेडे, मुख्यसचिव विवेक देशपांडे, अतिरीक्त मुख्य सचिव विनायक पांडे, नाना इगळे, विनयाक पांडे, माजी उपाध्यक्ष नाना इंगळे प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष चंद्रकांत महामुनी यासह इतर मान्यवर उपस्थित होते.बुलढाणा प्रादेशिक विभागाचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सर्व मान्यवरांचे कार्यकर्त्यांचे व ८५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांचे संभाव्य कार्यकर्त्यांचे यथोचित शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विदर्भ पश्चिम विभागाचे ना.ना. इंगळे यांना जिवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दत्तात्रय कोलते, एन. आभोरे, व्ही. ए. भानुसे, रुपदास बैरागी, यांनी परिश्रम घेतले.